# प्रेसनोट

दि. ०४/०२/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून राज्यकर सह आयुक्त, नोडल विभाग २, पुणे येथील राज्य कर निरीक्षक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय २७ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | तुषारकुमार दत्तात्रय माळी, वय ३३ वर्ष, पद - राज्य कर निरीक्षक, राज्यकर सह आयुक्त, नोडल विभाग २, पुणे (वर्ग-२, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०४/०२/२०२५ |
| सापळा दिनांक | ०४/०२/२०२५ रोजी |
| ठिकाण | वस्तु व सेवा कर भवन कार्यालय, येरवडा, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा वकिली व्यवसाय असून, ते जी.एस.टी. (G.S.T.) ची कामे करतात. त्यांच्या एका व्यापारी अशिलाचा जी.एस.टी. नंबर जी.एस.टी. विभागाने रद्द केला होता. तो पुर्नजिवीत (Revocation) करण्यासाठी यातील तक्रारदार हे त्या व्यापारी अशिलाच्या वतीने जी.एस.टी कार्यालय, येरवडा येथे गेले असता, लोकसेवक तुषारकुमार माळी, राज्य कर निरीक्षक, यांनी तक्रारदार यांचे व्यापारी अशिलाचे काम करुन देण्यासाठी त्यांच्याकडे ५,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक तुषारकुमार माळी यांनी तक्रारदार यांचे अशिलाचे वरील काम करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे स्वतःकरीता ५,०००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन, ती लाच रक्कम आज रोजी त्यांच्या सरकारी कार्यालयात तक्रारदार यांचेकडून ५,०००/- (पाच हजार) रुपये पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner